महाराष्ट्राचा मानबिंदू

लोकमत

पृष्ठे : १०+४ = १४, किंमत : ₹ ३.००

सिंधुदुर्ग, सोमवार, दि. ४ ऑगस्ट २०१४

# हळबे महाविद्यालयात स्नेहमेळावा उत्साहात

कसई दोडामार्ग : लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात तृतीय वर्ष वाणिज्य वर्गाचा शिक्षक, पालक व विद्यार्थी यांचा स्नेहमेळावा नुकताच झाला. शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यात सुसंवाद निर्माण व्हावा व त्यातूनच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीस हातभार लागावा, या उद्देशाने या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांचा शिक्षणाबरोबरच सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. यात पालक म्हणून आपली जबाबदारी काय आहे, हे जाणून घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आपला विद्यार्थी योग्य मार्गक्रमण करतो की नाही, याकडे लक्ष ठेवावे. आपला पाल्य फक्त परीक्षार्थी न बनता सर्वगुण संपन्न बनविणे आवश्यक असून त्यासाठी महाविद्यालयाप्रमाणेच कुटुंबातही शैक्षणिक वातावरण निर्माण करावे, असे आवाहन त्यांनी पालकांना केले. व्यासपीठावर डॉ. एम. टी. बेग, प्रा. एस. एन. खडपकर, डॉ. आर. एस. इंगळे, लाडोबा देसाई उपस्थित होते. मेळाव्यादरम्यान अनेक पालकांनी आपल्या सूचना मांडल्या. यावेळी बाळा गवस, गीतांजली बर्वे, प्रशांत ठाकूर आदींनी आपले विचार मांडले. सूत्रसंचालन ईशा बर्वे, आभार शिक्षक -पालक संघाचे निमंत्रक प्रा. एस. एन. खडपकर यांनी मानले. विद्यार्थ्यांच्यावतीने ईशा बर्वे, सुमिता गवस, राहुल पवार व प्रियांका गवस या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. (वार्ताहर)